आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ जुलै २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रेल्वेसाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेकरता रेल भूमी हे नवीन पोर्टल सुरू करण्याची रेल्वेमंत्र्यांची घोषणा

- भारत टेक्स २०२६चं नवी दिल्लीत भारत मंडपम इथं वस्त्रोद्योगमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- घाऊक चलन फुगवट्याच्या दरात जून महिन्यात १९ शतांश टक्के वाढ

- मोशी कचरा डेपो दुर्घटनेत एफआयआर दाखल

**आणि**

- जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची विजयी सलामी

**<><><><>**

रेल्वेच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेचं व्यवस्थापन व्हावं या उद्देशाने रेल भूमी या नावाने पोर्टल सुरू करण्यात येईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. नवी दिल्ली इथे भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी हाती घेतलेल्या सुधारणांबाबत ते आज पत्रकारांशी बोलत होते. रेल्वे मंत्रालयाने बांधकामासह अन्य क्षेत्रात सुधारणा केल्या आहेत. आता खतांची वाहतूकही रेल्वे कंटेनरमधून केली जाऊ शकते. विद्युत निर्मिती प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲश राखेची वाहतूक आता कंटेनरमधून केली जाईल, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले..

**होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव**

राखेच्या वाहतुकीसाठी एकिकृत परवाना प्रणालीची घोषणाही अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केली. ही प्रणाली जास्तीत जास्त दोन वर्षात सर्व प्रकल्पांमध्ये लागू केली जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

भारतातल्या साडेपाचशे जिल्ह्यांमधून सध्या वस्त्रोद्योग उत्पादनांची निर्यात होत असून सरकारच्या निर्यात विविधता धोरणामुळे जागतिक अनिश्चिततेच्या काळातही हे क्षेत्र भक्कम असल्याचं प्रतिपादन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी केलं. नवी दिल्लीत भारत

मंडपम इथे आयोजित भारत टेक्स २०२६ या भारतातल्या वस्त्रोद्योगाशी संबंधित सर्वात मोठ्या कार्यक्रमाचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झालं, तेव्हा ते बोलत होते. वस्त्रोद्योग राज्यमंत्री पवित्र मार्गेरिटा, वस्त्रोद्योग सचिव नीलम शमी राव आणि मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. 'एफ फाईव्ह', म्हणजेच फार्म, फायबर, फॅक्टरी, फॅशन आणि फॉरेन या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम असेल. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाचं आयोजन वस्त्रोद्योगाच्या मूल्य साखळीतले व्यवसाय, गुंतवणूक, स्रोत, नावीन्य, धोरणात्मक चर्चा आणि भागीदारीसाठी एक प्रमुख व्यासपीठ बनवण्याच्या उद्देशाने करण्यात येत आहे. हे प्रदर्शन खरेदीचे सर्व विक्रम मोडेल, असा विश्वास गिरीराज सिंह यांनी यावेळी व्यक्त केला...

**होल्ड... बाईट - गिरीराज सिंह**

**<><><><><>**

पश्चिम आशियातला संघर्ष आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीत झालेली जहाजांची नाकेबंदी यांमुळे घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर जून महिन्यात वाढून ९ पूर्णांक ८७ शतांश टक्क्यांवर पोहोचला आहे. उद्योग आणि वाणिज्य मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. मे महिन्यात हा दर ९ पूर्णांक ६८ शतांश टक्के इतका होता. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर मात्र जून महिन्यात ७ पूर्णांक ४८ टक्क्यांवर कायम राहिला आहे. रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी चलन फुगवट्याचा अंदाज ४ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवरून ५ पूर्णांक १ दशांश टक्क्यांपर्यंत वाढवला आहे.

**<><><><><>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या 'एमटी अल बाहिया' आणि 'एमटी मोम्बासा' या दोन जहाजांवर झालेल्या हल्ल्याबद्दल भारताने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या दोन्ही जहाजांवरच्या एकूण ४६ कर्मचाऱ्यांमध्ये ३० भारतीय खलाशांचा समावेश होता.

या हल्ल्यात 'एमटी अल बाहिया' जहाजावरच्या १२ भारतीय खलाशांपैकी एकाचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला. तसंच 'एमटी मोम्बासा' या जहाजावरच्या १८ भारतीय खलाशांपैकी ९ जण जखमी झाले असून, त्यापैकी दोन जणांची प्रकृती गंभीर असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतल्या जलवाहतुकीमध्ये अडथळा आणणाऱ्या या हल्ल्यांचा आणि भारताने तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

<><><><><>

भारत आणि युनायटेड किंगडम दरम्यानचा सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार उद्यापासून लागू होणार आहे. या महत्त्वाच्या करारामुळे भारतातून युके मध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातीवर कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही. परस्परांबरोबरची धोरणात्मक भागीदारी दृढ करून नागरिकांना समृद्धी मिळवून देण्याच्या दिशेने हे महत्वाचं पाऊल समजलं जात आहे.

<><><><><>

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम, २०१३ मध्ये सुधारणा करायला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचा आणि महामंडळाच्या जागांचा विकास करायला मान्यता मिळाली.

राज्यातल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तांसाठी मुद्रीकरण धोरणाला आज मंजुरी मिळाली. यामुळे मालमत्तांच्या वापरातून पारदर्शक आणि अधिक चांगले उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करता येतील. तसंच अल्पकालीन आणि दीर्घकालीन नियोजनातून महापालिका, नगरपालिका, नगरपररिषदा, नगरपंचायतींना मिळकतीचे उपाय शोधता येतील. राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अर्बन चॅलेंज फंड अभियान राबवलं जाणार असून, शहरांना दर्जेदार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी बाजाराधारित वित्तपुरवठा मिळविता येईल.

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६च्या निकषात सुधारणा करायला तसंच २०२९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून, नियमित कर्जमाफीला आज मंजुरी देण्यात आली.

<><><><><>

पुणे जिल्ह्यात पिंपरी-चिंचवड इथल्या मोशी कचरा डेपो दुर्घटना प्रकरणी पोलिसांनी एका खासगी ऊर्जा निर्मिती कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. डेपोमध्ये या कंपनीचं कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करणारं केंद्र आहे. मुसळधार पावसामुळे डेपोमधला कचऱ्याचा ढिगारा धोकादायक ठरू शकतो, याची माहिती असूनही, कंपनीने कोणतीही सुरक्षा विषयक उपाययोजना केली नव्हती, अशी महानगरपालिकेची तक्रार आहे.

दरम्यान, या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी आणि भविष्यात अशा घटना होऊ नयेत, यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी राज्यसरकारने एक स्वतंत्र उच्च-स्तरीय समिती स्थापन केली आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कसलीही दुही किंवा मतभेद नाहीत, असं पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केलं आहे. सुनेत्रा पवार यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेल्या निवडीला आव्हान देण्याबाबत पक्षाचे राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंग यांनी लिहिलेलं पत्र निरर्थक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या मुद्द्यावर पक्षाचे सर्व नेते सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

शिक्षक पात्रता परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांना या परीक्षेची नवीन तारीख जाहीर करण्याची आणि फुटीला जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्याची मागणी केली केली आहे. या परिस्थितीचा फटका बसलेल्या उमेदवारांना वयोमर्यादेत सवलत देण्याची मागणीही गांधी यांनी केली आहे. दोन आठवडे उलटूनही नवी तारीख जाहीर केली नसल्याचं गांधी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

'नीट' युजी फेर परीक्षेची ओएमआर शीट आणि उमेदवारांनी नोंदवलेल्या प्रतिक्रिया, एनटीए, अर्थात राष्ट्रीय परिक्षा संस्थेने प्रसिद्ध केल्या आहेत. उमेदवार त्यांच्या ॲप्लिकेशन नंबरचा वापर करून लॉग इन करू शकतील, आणि आपल्या मूळ उत्तरांची पडताळणी करू शकतील, अशी माहिती परीक्षा संस्थेच्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.

<><><><><>

जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून टोकियो इथं प्रांरभ झाला.
भारताच्या पी. व्ही सिंधूने मलेशियाच्या वोंग लिंग चिंगला २१-१४, २१-११ असं हरवलं. मिश्र दुहेरीत तनिषा क्रॅस्टो आणि धृव कपिला यांच्या जोडीने स्कॉटलंडच्या अलेक्झांडर डन आणि ज्युली मॅकफर्सन या जोडीला २१-१६, २१-१४ असं पराभूत केलं. पुरुष एकेरीत आयुष शेट्टी आणि लक्ष्य सेन यांचे सामने उद्या होतील.

**<><><><><>**

नुकत्याच झालेल्या ५६व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदकं पटकावणाऱ्या भारताच्या ५ विद्यार्थ्यांचा सत्कार आज होमी भाभा विज्ञान आणि शिक्षण केंद्रात झाला. यापैकी रिद्धेश बेंडाळे या इंदोरच्या विद्यार्थ्यानं ऑलिम्पियाडच्या प्रायोगिक विभागात भारताकडून आत्तापर्यंतच्या सगळ्यात जास्त गुणांची कमाई केली आणि सर्वोत्तम १० स्पर्धकांमध्ये स्थान मिळवलं. आकाशवाणीशी बोलताना त्याने या स्पर्धेचे अनुभव सांगितले.

***होल्ड... बाईट- रिद्धेश बेंडाळे***

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंडदरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज बर्मिंगहॅम इथं होणार आहे. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय वेळेनुसार साडे तीन वाजता खेळ सुरु होईल.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात पावसानं ओढ दिल्यामुळे अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई कायम आहे. या टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनानं जिल्ह्यातल्या १८२ विहिरी आणि कूपनलिका अधिग्रहित करून पाणी पुरवठा सुरु ठेवला आहे. जिल्ह्यात सर्वात जास्त पाणी टंचाई अहमदपूर तालुक्यात जाणवत आहे. नागरिकांनी काटकसरीनं पाण्याचा वापर करावा, आणि उपलब्ध जलस्रोतांचं संवर्धन करण्यासाठी सहकार्य करावं, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**नंदुरबार** जिल्ह्यातही पावसानं पाठ फिरवल्यामुळे पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीसाठीही पाणी संकट निर्माण झालं आहे. जिल्ह्यात यंदा सरासरीच्या केवळ २८ टक्के पावसाची नोंद झाली आहे. पाऊस घटल्यानं जिल्ह्यातले शेतकरी बाजरीसारख्या पिकांना पसंती देत आहेत. पिकनिवडीबाबत जागरूकता वाढवण्यासाठी कृषी विभाग कार्यशाळा आयोजित करत असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीकविमा काढावा असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**//<><><><><>//**